NDW-RP-5



Impact Factor – 7.675 ISSN – 2278-9308

# B.Aadhar

## Peer-Reviewed & Refreed Indexed

### Multidisciplinary International Research Journal

## April -2021

**ISSUE No- (CCLXXX ) 280 ( A)**

## महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव विशेषांक

**Prof. Virag.S.Gawande**
Chief Editor
Director
Aadhar Social Research &, Development Training Institute, Amravati.

**Dr.Sudhir B.Gaikwad,**
**Editor**
M.A(Sociology),NET,SET,Ph.D., MSW,NET,Ph.D.(Ongoing)
Associate professor
Jalna College of Social work Jalna, Maharashtra

**Dr.Sheshrao M.Naikwade**
**Executive – Editors**
M.A.M.Phil ,Ph.D , NET
Associate professor
Nagnath Arts, Commerce & Science College, Aundha Nagnath. Dist.Hingoli,

**Aadhar International Publication**
For Details Visit To : **www.aadharsocial.com**
© All rights reserved with the authors & publisher

Savitribai College of Arts, Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar
ID. No. PU/AN/A/ 58/1999

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 280 (CCLXXX) A
ISSN : 2278-9308
April, 2021

# Editorial Board

**Chief Editor -**
**Prof.Virag S.Gawande,**
**Director,**
Aadhar Social Research &,
Development Training Institute, Amravati. **[M.S.] INDIA**

**Executive-Editors -**

- **Dr.Dinesh W.Nichit** - Principal, Sant Gadge Maharaj Art's Comm,Sci Collage, **Walgaon.Dist. Amravati.**
- **Dr.Sanjay J. Kothari** - Head, Deptt. of Economics, G.S.Tompe Arts Comm,Sci Collage Chandur Bazar Dist. Amravati

**Advisory Board -**

- **Dr. Dhnyaneshwar Yawale** - Principal, Sarswati Kala Mahavidyalaya , Dahihanda, Tq-Akola.
- **Prof.Dr. Shabab Rizvi** ,Pillai's College of Arts, Comm. & Sci., New Panvel, Navi Mumbai
- **Dr. Udaysinh R. Manepatil** ,Smt. A. R. Patil Kanya Mahavidyalaya, Ichalkaranji.
- **Dr. Sou. Parvati Bhagwan Patil** , Principal, C.S. Shindure College Hupri, Dist Kolhapur
- **Dr.Usha Sinha** , Principal ,G.D.M. Mahavidyalay,Patna Magadh University.Bodhgay Bihar

**Review Committee -**

- **Dr. D. R. Panzade,** Assistant Pro. Yeshwantrao Chavan College, Sillod. Dist. Aurangabad (MS)
- **Dr.Suhas R.Patil** ,Principal ,Government College Of Education, Bhandara, Maharashtra
- Dr. **Kundan Ajabrao Alone** ,Ramkrushna Mahavidyalaya, Darapur Tal-Daryapur, Dist-Amravati.
- **DR. Gajanan P. Wader** Principal , Pillai College of Arts, Commerce & Science, Panvel
- **Dr. Bhagyashree A. Deshpande**, Professor Dr. P. D. College of Law, Amravati]
- **Dr. Sandip B. Kale,** Head, Dept. of Pol. Sci., Yeshwant Mahavidyalaya, Seloo, Dist. Wardha.
- **Dr. Hrushikesh Dalai** , Asstt. Professor K.K. Sanskrit University, Ramtek

*Our Editors have reviewed paper with experts' committee, and they have checked the papers on their level best to stop furtive literature. Except it, the respective authors of the papers are responcible for originality of the papers and intensive thoughts in the papers.*

**- Executive Editor**

**Published by -**
**Prof.Virag Gawande**
**Aadhar Publication** ,Aadhar Social Research & Development Training Institute, New Hanuman Nagar, In Front Of Pathyapustak Mandal, Behind V.M.V. College,Amravati
( M.S ) India Pin- 444604 **Email :** aadharpublication@gmail.com
**Website :** www.aadharsocial.com **Mobile :** 9595560278 /

Savitribai College of Arts, Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar, ID No. PU/AN/A/58/1999
PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

ISSN : 2278-9308
April, 2021


| | | |
|---|---|---|
| 22 | महात्मा ज्योतिबा फुले आणि संघर्ष प्रा.डॉ.रोहित पंजाबराव काळे | 88 |
| 23 | महात्मा फुले यांची अखंडादी काव्यरचना गणेश शंकर घनसावंत | 90 |
| 24 | स्वातंत्र्यप्रेमी डॉ. बाबासाहेब आंबेडकर **श्री.आर.आर.कांबळे** | 97 |
| 25 | महात्मा ज्योतीबा फुले यांचे शेतीविषयक विचार<br>**बनकर अभिनिता लक्ष्मण /डॉ. जी. एच. बानायत** | 101 |
| 26 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्रिया व कामगार<br>**ढेपे प्रिती किशोर /प्रा. डॉ. एस. एस. मानकर** | 104 |
| 27 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे बोद्ध धम्मातील योगदान<br>**श्रीसुंदर वनमाला देविदास /प्रा. डॉ. बी. बी. लिहिणार** | 107 |
| 28 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्रिया प्रा. अंभोरे अशोक गंगाराम | 111 |
| 29 | म.फूले यांचे शिक्षण विषयक विचार<br>प्रा.डॉ.गणेश गोपाळराव मालटे/ प्रा.नरहरी सयाजी राऊत | 116 |
| 30 | महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार व कार्य<br>वाजगे नवनाथ दत्तात्रय | 119 |
| 31 | डॉ.महात्मा फुले यांचे सामाजिक विचार **प्रा. अनिल बाबुराव कांबळे** | 123 |
| 32 | महात्मा ज्योतीबा फूले यांचे सामाजिक विचार प्रा.चिन्नना चालुरकर | 128 |
| 33 | महात्मा ज्योतिबा फुले आणि समाज सुधारणा **प्रा.घाडगे सोमनाथ व्यंकटी** | 131 |
| 34 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा कृषीविषयक दृष्टीकोण डॉ.पी.आर.बोबडे | 135 |
| 35 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि स्त्रिया .प्रसेनजित सत्यजीत चिखलीकर | 141 |
| 36 | समाजक्रांतीचे जनक : महात्मा जोतीराव फुले **प्रा. डॉ. सोनवले राजकुमार रंगनाथ** | 144 |
| 37 | महात्मा ज्योतिबा फुले यांचे शिक्षण विषयक विचार प्रा.डॉ.रमेश पांडुरंग पोळ. | 150 |
| 38 | महात्मा ज्योतीराव फुले यांचे शेतीविषयक विचार'<br>प्रा.डॉ.प्राजक्ता प्रल्हादराव निकम | 154 |
| 39 | महात्मा ज्योतिबा फुले यांचे शिक्षण विषयक विचार<br>डॉ. नारायन मो. वघाळे (ग्रंथपाल) | 159 |
| 40 | नवसंस्कृतीचे जनक महात्मा जोतीराव फुले: कार्य आणि कतृत्व<br>प्रा. विजयश्री गवळी | 163 |
| 41 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे स्त्रिविषयक विचार:- प्रा.के.जे.खंदारे | 167 |
| 42 | डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आर्थिक विचार **प्रा.सुनिल देवराव मिरासे** | 171 |
| 43 | पत्रकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर **सहयोगी प्रा. सुहास मुरलीधर उघडे** | 173 |
| 44 | शिक्षण ही महत्वाची गरज — डॉ.बाबासाहेब आंबेडकर<br>रामदास बाबुराव जगताप | 178 |


Savitribai College of Arts, Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar
PU/AN/A/ 58/1999

PRINCIPAL
Savitribai College of Art's
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. A.Nagar

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 280 (CCLXXVI) A
ISSN : 2278-9308
April, 2021

# महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार व कार्य

वाजगे नवनाथ दत्तात्रय
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग,सावित्रीबाई कला महाविद्यालय,
पिंपळगाव पिसा, ता. श्रीगोंदा, जि. अहमदनगर, (महाराष्ट्र)
मो.नं. ८८०५१०९६३७ ई—मेल : ndwajage@gmail.com

महात्मा फुले यांचे शिक्षणाच्या क्षेत्रातील कार्य अत्यंत महत्त्वाचे असून आधुनिक भारताच्या जडणघडणीत महात्मा फुल्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. महाराष्ट्रातील स्त्री शिक्षणाचा तसेच अस्पृश्यांच्या शिक्षणाचा श्रीगणेशा त्यांनीच सर्वप्रथम केला.

विद्येविना मति गेली। मतीविना नीति गेली।।
नीतिविना गती गेली। गतीविना वित्त गेले।।
वित्ताविना शूद्र खचले।
इतके अनर्थ एका अविद्येने केले।।

महात्मा फुल्यांच्या वरील काव्यपंक्तीमधून शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले आहे. महात्मा फुले यांच्या शिक्षण विषयक विचारांचे सार या काव्यपंक्तीतून व्यक्त होते.

महात्मा फुले यांचे शिक्षण विषयक कार्य :

इ.स. १८४८ मध्ये महात्मा फुले यांनी महाराष्ट्रातील मुलींची पहिली एतद्देशीय शाळा सुरु केली. पुढे ३ जुलै १८५१ रोजी बुधवार पेठेत आण्णासाहेब चिपळूणकर यांच्या वाडयात मुलींची शाळा सुरु केली. सुरुवातीला या शाळेत आठ मुली होत्या. पुढे त्यांची संख्या वाढत जाऊन ती ४८ पर्यत पोहोचली. आण्णासाहेब चिपळूणकर यांनी मुलींच्या शाळेसाठी जागा दिल्याने महात्मा फुले यांच्या स्त्री शिक्षणाच्या कामाला गती मिळाली. दि. १७ सप्टेंबर १८५१ रोजी महात्मा फुले यांनी पुण्यातील रास्ता पेठेत मुलींची दुसरी शाळा सुरु केली. १५ मार्च १८५२ रोजी वेताळ पेठेत् मुलींची तिसरी शाळा सुरु् केल. या शाळांमध्ये शिक्षिका नसल्यामुळे आपली पत्नी सावित्रीबाई यांना शिक्षित करुन त्यांना या शाळांमध्ये स्त्री शिक्षिका बनविले. सावित्रीबाईना शिक्षण देण्याची जबाबदारी महात्मा फुले यांचे मित्र सखाराम यशवंत परांजपे आणि केशव सिताराम भवाळकर यांनी पार पाडली. सावित्रीबाई फुले यांना केवळ महाराष्ट्रातील नव्हे तर देशातील पहिली महिला स्त्री—शिक्षिका होण्याचा मान प्राप्त झाला. महात्मा फुले यांच्या शिक्षणविषयक कार्यात सावित्रीबाई फुले यांचे हे योगदान अतिशय मोलाचे ठरले.

महिलांबरोबरच अस्पृश्यांच्या शिक्षणाचा प्रश्न सोडवण्याचा प्रयत्न देखील सर्वप्रथम महात्मा फुले यांनीच केला. इ.स. १८५१ मध्ये महात्मा फुले यांनी पुणे येथे अस्पृश्यांसाठी शाळा सुरु केली, ही शाळा देखील महाराष्ट्रातील अस्पृश्यांसाठी काढलेली पहिली शाळा होती. इ.स. १८५२ मध्ये महात्मा फुले यांनी विद्येत मागासलेल्या लोकांसाठी एक वाचनालय सुरु केले. इ.स. १८५५ मध्ये त्यांनी रात्र शाळेची स्थापना केली. भारतातील शिक्षणविषयक प्रश्नांचा अभ्यास करुन त्याबाबत शिफारशी करण्यासाठी ब्रिटिश सरकारने इ.स. १८८२ मध्ये सर विल्यम हंटर यांच्या नेतृत्त्वाखाली शिक्षण आयोगाची स्थापना केली होती. महात्मा फुले यांनी हंटर कमिशनसमोर १९ ऑक्टोबर १८८२ रोजी महाराष्ट्रातील शिक्षणाच्या स्थितीसंबंधी भाष्य करणारे बारा पानांचे निवेदन सादर केले होते. या निवेदनात त्यांनी शिक्षणविषयक काही मूलभूत प्रश्न मांडले. मागासलेल्या देशांमध्ये कोणत्या प्रकारची शिक्षणपध्दती पाहिजे, त्याची उद्दिष्टये कोणती असावीत, त्यासाठी



Savitribai College of Arts Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar I.D. No. PU/AN/A/ 58/1999

PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

समाज व शासन यांची कोणती कर्तव्ये आहेत यांसारखे प्रश्न त्यांनी निवेदनात स्पष्ट केले आहेत. निवेदनात प्रारंभी महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांनी सुरु केलेल्या शाळेबद्दल माहिती आहे त्यानंतर प्राथमिक, देशी व उच्च शिक्षणाच्या संबंधी मौखिक अशा सूचना केल्या आहेत.

महात्मा फुले यांचे शिक्षणविषयक विचार :

सार्वत्रिक शिक्षण :

महात्मा फुले यांच्या मते, ईश्वरानेच सर्व मानव निर्माण केल्यामुळे तो सर्वांना सारखेच अधिकार देईल, त्यांच्यात कोणताही भेदभाव करणार नाही. या सिध्दांतानुसार समाजातील प्रत्येक व्यक्तीला शिक्षण घेण्याचा अधिकार आहे. मनुष्य कोणत्याही जातीत जन्मला तरी तो शिक्षणापासून वंचित राहू नये. अनेक शतकांपासून अस्पृश्य व दीन दलित जनतेला ज्ञानार्जनाची दारे बंद झाली होती. त्यामुळे या वर्गाची सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक क्षेत्रात अवनती होऊन त्यांच्या वाटयाला हालाखीचे जीवन आले. या दैन्यावस्थेमधून त्यांना बाहेर काढण्याचा एकमेव मार्ग म्हणजे केवळ निरीक्षण हाच आहे, अशी महात्मा फुले यांची ठाम भूमिका होती.

सामाजिक न्याय व मानवतावादी मूल्य विकासासाठी शिक्षण :

शिक्षण प्रक्रियेतून समाजात समता प्रस्थापित होऊन जातिधर्माच्या आधारावर श्रेष्ठ व कनिष्ठ या संकल्पना राहू नयेत. समाजात सर्वांसाठी एकच न्याय हे तत्त्व आवश्यक असून ही भावना सर्वांपर्यंत पोहचावी यासाठी शिक्षण आवश्यक आहे. शिक्षणामुळे केवळ कारकून निर्माण न होता माणंसामाणसातील सामाजिक अंतर मिटणे आवश्यक आहे. त्यासाठी मानवतावादी मूल्यांची शिकवण शिक्षणाच्या माध्यमातून मिळावी. सार्वजनिक सत्यधर्मातून मानवतावादाचा आणि विश्वधर्माचा पुरस्कार व्हावा असे मूल्य शिक्षणाच्या माध्यमातून प्रस्थापित व्हावे असे महात्मा फुले यांना वाटत होते.

कौशल्याधारित व उपजिविकाप्रधान शिक्षण :

माध्यमिक शिक्षण हे केवळ कारकून निर्माण करण्यापुरते मर्यादित नसावे. अभ्यासक्रमाची पुनर्रचना करुन त्यात वेगवेगळया व्यावसायिक कौशल्यांच्या विकासावर भर देण्यात यावा. महात्मा फुले यांच्या मते ग्रामीण भागामध्ये शाळांची विशेष आवश्यकता आहे. ग्रामीण भागातील बहुसंख्य लोक शेतीचा व्यवसाय करत असल्यामुळे तेथील मुलींचा अभ्यासक्रम व शिक्षणाचे स्वरूप हे शेतीच्या कामाशी निगडीत असावे शिक्षण हे उपजिविकाप्रधान असावे व त्यामधून स्थानिक गरजा, आरोग्य व जीवनावश्यक बाबींचा विचार करायला हवा.

महिला व अस्पृश्यांसाठी शिक्षण :

परंपरांच्या ओझ्याखाली दबलेल्या महिलांची मुक्ती ही केवळ शिक्षणाच्या माध्यमातूनच होईल अशी महात्मा फुले यांची ठाम भूमिका होती. महात्मा फुले यांच्या मते समाजातील अस्पृश्यतेची समस्या मिटवायची असेल तर दलित समाजाने शिक्षण घेतले पाहिजे. शिक्षणामुळे समाजातील स्पृश्य–अस्पृश्यतेची भावना नष्ट होऊ शकते. त्याचबरोबर शिक्षणातून विविध जीवनोपयोगी मूल्ये विकसित होऊन मुलांमध्ये श्रमप्रतिष्ठा निर्माण व्हावी तसेच समता व बंधुता या मूल्यांचा विकास शिक्षणाच्या माध्यमातूनच होऊ शकतो असे महात्मा फुले यांचे मत होते.

सक्तीच्या शिक्षणाचा कायदा करावा :

'शेतकऱ्यांनी विद्या शिकू नये' म्हणून पुराणिक व कथाडया भटांनी त्यांच्या मनावर इतकी छाप बसविली आहे की, शेतकऱ्यास आपली मुले विद्वान करण्यामध्ये मोठे पाप वाटते. आपले अष्टपैलू धार्मिक सरकार ज्या मानाने शेतकऱ्यांपासून नानां प्रकारचे कर, पट्टया, लोकल फंड वगैरे बाबी गोळा करते, त्याप्रमाणे त्यांनी प्रथम एकंदर सर्व खेडयापाडयातील सरकारी मराठी व इंग्लिश शाळा बंद करुन शेतकऱ्यांवर थोडीशी इमाने इतबारे मेहरनजर करुन शेतकऱ्यांपैकीच शिक्षक तयार



Savitribai College of Arts, Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar, ID. No. PU/AN/A/ 58/1999
PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

करण्याकरता दर एक तालुक्याने लोकल फंडापैकी रकमा खर्ची घालून शेतकऱ्यांच्या मुलास अन्न, वस्त्रे, पुस्तके, वगैरे पुरवून त्यांच्या मुलांकरता बोर्डींग शाळा करावयात व त्या शाळामध्ये त्या मुलांपैकी शाळा गुरु तयार केल्यानंतर फक्त त्यांच्या शाळांनी शूद्र शेतकऱ्यांनी आपली मुले अमुक वर्षांचे वयाची होईतो पावेतो अभ्यास करण्याकरीता पाठवावीत म्हणून कायदा केल्याशिवाय शेतकऱ्यांचे मुलास, थोडेसे का होईना, परंतु खरे ज्ञान झाल्यावाचून त्यांच्या मनावरील कृत्रिमी ब्राह्मणांनी उमटविलेला ठसा फिक्का पडावयाचा नाही'' (शेतकऱ्याचा आसूड)

**प्राथमिक शिक्षणाबाबत विचार :**

''जर सरकारने उच्च शिक्षणाकडे थोडे लक्ष दिले आणि जनतेच्या प्राथमिक शिक्षणाकडे थोडे अधिक लक्ष दिले, तर नीतीने आणि वागणुकीने बरेच चांगले असे लोक नोकरी करण्यासाठी शिकून तयार करण्यात अडचण येणार नाही.'' (गुलामगिरी)

''मुंबई इलाक्यात प्राथमिक शिक्षणाची अगदीच आबाळ झाली आहे. प्राथमिक शाळांना योग्य ती उपकरणे पुरविण्यात येणार नाहीत. सरकार शिक्षणाकरीता कर घेते आणि तो पैसा ज्या कामासाठी उभा केला जातो त्या कामासाठी मात्र खर्च होत नाही, याविषयी दु:ख वाटते. माझे असे मत आहे की, प्राथमिक शिक्षण काही वयोमर्यादेपर्यंत सक्तीने करावे, निदान बारा वर्षे वयोमर्यादेपर्यंत तरी करावे.'' (गुलामगिरी)

''सरकारी शाळांमधून जे प्राथमिक शिक्षण देण्यात येते, ते पक्क्या आणि समाधानकारक पायावर उभारले पाहीजे. विद्यार्थ्यांच्या भावी आयुष्यक्रमात ते उपयुक्त आणि व्यवहारोपयोगी ठरले पाहीजे. अभ्यासक्रम आणि शिक्षणयंत्रणा याची आमलाग्र सुधारणा व्हायला पाहीजे. शिक्षकांच्या नोकरीचे नियम आणि अटी हेच अधिक सोयीच्या नी स्वास्थ्यदायी पाहिजेत. त्यांच्या पगारात आणि दर्जात वाढ केली पाहिजे. अध्यापनशास्त्राची परीक्षा दिलेल्या शिक्षकांच्याच नेमणूका मुख्यत्त्वे व्हायला हव्यात. (गुलामगिरी)

**माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण :**

''प्रचलित माध्यमिक शिक्षण हे सर्वसामान्यांच्या जीवनाच्या दृष्टीने अव्यवहार्य व अयोग्य आहे. कारकून आणि शिक्षक निर्माण करणे एवढाच काय तो त्याचा उपयोग.'' (गुलामगिरी)

''सरकारी महाविद्यालयातून दिल्या जाणाऱ्या शिक्षणाचे स्वरुप सर्वसाधारण जीवनातील गरजा भागविण्याच्या दृष्टीने उपयोगी ठरावे.''

''विद्यापीठ श्रीमंतांच्या मुलांना शिक्षण देतात आणि त्यांची ऐहिक उन्नती साधण्यासाठी साहय करतात, परंतु त्या विद्यापीठातून निघालेल्या सुशिक्षितांनी आपल्या देशबांधवांच्या कार्यात काहीही भर घातली नाही.''

**महात्मा फुले यांच्या शिक्षणविषयक कार्याचे मूल्यमापन :**

पंडित जवाहरलाल नेहरु यांच्या मते, ''ज्या काळात महात्मा फुले स्त्री शिक्षणासाठी आणि अस्पृश्यता निवारणासाठी लढले ते दिवस असे होते की, त्यांना कोणत्याही तऱ्हेची कुठूनही मदत मिळणे अशक्य होते.'' तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मते, ''हिंदू समाजातील बहुजन समाजात आत्मप्रत्यय व आत्मावलोकन उत्पन्न करणारा पहिला माणूस म्हणजे ज्योतिबा फुले होय. हिंदी बहुजन समाजाच्या सामाजिक गुलामगिरीचा प्रथम प्रत्यय किंवा पहिली ओळख झालेला, बहुजन समाजातला पहिला माणूस म्हणजे जोतिबा फुले हा होय.'' प्रा. गं.बा. सरदार यांच्या मते, ''हिंदू धर्म ग्रंथातील तत्त्वज्ञान कितीही उच्च व श्रेष्ठ असले तरी, हिंदू संस्कृतीचे अंतरंग कितीही उदात्त व व्यापक असले तरी देखील आमच्या तत्कालिन उच्च वर्णीयांच्या आचार विचारात, स्वार्थ आणि संकुचितपणा, अन्याय आणि अवनती यांचेच प्रस्थ माजले होते हे खोटे नाही. जो समाज



Savitribai College of Arts ID. No. PU/AN/A/ 58/1999 Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar
PRINCIPAL
Savitribai College of Arts
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

आपण आपला मानतो, त्यात आपल्या आप्तेष्टान्च्या वाटयाला दुःख व दारिद्रय, अपमान व उपेक्षा याशिवाय दुसरे काही नाही हे जातिगवांना धडधडीत दिसले होते.

अशाप्रकारे सामाजिक सुधारणेबरोबरच शैक्षणिक क्षेत्रात देखील महात्मा फुले यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरले. भारतातील स्त्री शिक्षणाचा पाया खऱ्या अर्थाने महात्मा फुले यांनीच रोवला. बहुजन समाजाला शिक्षणाची कवाडे त्यांनीच सर्वप्रथम उघडी केली. अस्पृश्यांच्या शिक्षणाचा प्रश्न त्यांनीच सर्वप्रथम सोडविला. १४ वर्षे वर्यापर्यंत दिले जाणारे शिक्षण हे सक्तीचे व मोफत असावे हे त्याचे तत्त्व आजही महत्त्वाचे मानले जाते. यावरुन महात्मा फुले यांच्या कार्याची थोरवी आजही महत्त्वाची वाटते.

संदर्भग्रंथ :

१. द.के. गंधारे, महात्मा फुले यांचा शिक्षण विचार, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, २०१३.
२. रा.तु. भगत, शिक्षणातील थोर विचारवंत, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, २००५.
३. धनंजय कीर, महात्मा जोतीराव फुले, पॉप्युलर, प्रकाशन, मुंबई, १९६८.
४. शं.भा. गोंधळेकर, शैक्षणिक संक्षिप्त कोश, व्हिनस प्रकाशन, पुणे, १९५९.
५. ए.के. घोरपडे, महात्मा फुले, चरित्र व कार्य, प्रकाशक – ग.ल. ठोकळ, पुणे, १९६६.
६. य.दि. फडके (संपा.), महात्मा फुले समग्र वाङ्मय, श्रीविद्या प्रकाशन, पुणे, १९९०.

Savitribai College of Arts
ID. No. PU/AN/A/ 58/1999
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. Ahmednagar

PRINCIPAL
Savitribai College of Art's
Pimpalgaon Pisa, Tal. Shrigonda, Dist. A.Nagar